Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Volume-2, Issue-5, Nov-2012 Available online at www.aygrt.isrj.net

आदिम जमातीच्या शोषणाचे प्रतीक:वाडा

अशोक कांबळे

मराठी विभाग प्रमुख , आबासाहेब पारवेकर महाविद्यालय, यवतमाळ.

सारांश :- आधुनिक मराठी भाषेतील गद्य–साहित्याची परंपरा ढोबळमानाने दीडशे वर्षाची समजली जाते. या दिडशे वर्षाच्या कालखंडात मराठी साहित्यातील कादंबरी वाङ्मय प्रकार विविध वाटावळणांनी विकसित झालेला दिसतो. यमुना–पर्यटन व मुक्तामालादी अद्‌भुत व सामाजिका असा प्रवास केलेला दिसतो. हरिभाऊ आपटेंचा सन्मानित अपवाद वगळता प्रभावी समाजजीवनाचे चित्रण नंतरच्या मराठी कादंबरीत झालेले दिसत नाही. परंतु ही कोंड दलित साहित्यातील कादंबरीने फोडली. व्यापक सखोल सामाजिक जीवनजणीव समग्र अंगीने अभिव्यक्त झाली व त्याचा परिणाम आदिवासी साहित्यावर झाली ही खरी वस्तुस्थिती आहे.

प्रस्तावना-

प्रा.माधव सरकुंडे यांची 'वाडा' ही पहिलीच कादंबरी आंध (आदिवासी) जमातीच्या जीवनातील समग्र शोषणाची, गुलामगिरीचे उत्कट चित्रण करते. मराठी साहित्यात आदिवासींच्या जीवनावर काही कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. अलिकडे डॉ. मधुकर वाकोडे (झेलझपाट), सुरेश द्वादशीवार (हाकुमी) पण त्या आदिम जीवनाला पुरेशा प्रमाणात न्याय देऊ शकल्या नाहीत. परंतु आज आदिवासी लेखक जाणीवपूर्वक ताकदीने बोलू, लिहू लागला आहे. ही कादंबरी त्याचेच पुढले पाऊ आहे.

लेखकाने आंध जमातीचे प्रत्यक्ष जीवनच भोगले असल्यामुळे आंधवाडीतील सामाजिक, सांस्कृतिक संघर्ष जिवंतपणे प्रत्ययास येतो. जीवनाचे विविध पैलू व वास्तावाचे वैश्विक भान ठेवून अनुभव तीव्रपणे मुखरित झाला आहे. आंध–आदिवासीच्या जीवनातील प्रश्नांना व सामाजिक समस्यांना वाचा फोडून तळालाच हात घातला आहे. जीवनाचे खाचखळगे धुंडाळात निखळ वास्तवाचे भेदक अन् निर्मम चित्रण करून उपेक्षितांच्या जीवनाचे प्रतिनिधिक चित्रण समर्थपणे रेखाटले आहे. तमाम मानवी दु:खाची जात एकच आहे हे सूत्र डोळयासमोर ठेवून लेखक कादंबरीतील पात्रे सजगपणे उभे करतो.

आंध जमातीतील माणसाच्या मनाचे विविध पदर व त्याची झालेली कोंडी सोडविण्याची लेखकाची तळमळ लक्षणीय आहे. एकीकडे दु:ख, दैन्य, दारिद्रयाचा भोगवटा यामुळे संताप, चीड, संघर्ष आहे पण तेवढाच मनाचा उदात्तपणा, संयम आहे. जीवनाकडे तटस्थपणे बघून दु:ख निवारणाची सम्यक् वाटचाल करून माणसाला माणसासारखे जगता कधी येईल ही तीव्र जाणीव कादंबरीत प्रखरपणे दिसून येते. सामाजिक अन्यायाने पेटून उठणारा आंधचा काजवा बाज्या हा या कादंबरीचा नायक आहे. गावच्या पाटलाने केलेल्या सतत अन्याय–अत्याचाराला समर्थपणे तोंड देतो. तो लाचारी पत्करत नाही. स्वाभिमानाचा बळी देत नाही. आंधवाडी बाज्याला समजून घेत नाही. ते पाटलाच्या वर्चस्वाखाली गुलाम होऊन जगण्यातच धन्यता मानतात. परंतु बाज्याच्या संघर्ष अविरत सुरूच असतो.

पाटील ही ग्रामीण व्यवस्थेतील शोषणाची, गुलामगिरी लादणारी, जीवनघेणी समाजव्यवस्था आजही खेडयापाडयात अस्तित्वात आहे. ग्यानबा पाटलाची केवळ दोन घरं असून संपूर्ण आंधवाडीवर पाटी अधिराज्य गाजवितो. आंधाचा छळ करतात. वाटेल त्या मार्गाने आंधाचे भयानकपणे शोषण करतात. बाज्याला गुलामगिरी सहन होत नाही. तो पाटलाच्या एकदंरीत व्यवस्थेवरच आसूड फटकरतो व सतत व्यवस्था, परिवर्तनाचे समीकरण मांडत असतो. बाज्या क्रांतिकारी भूमिका वठवितो. ''आबा,आपण गरीत हावं, हे मान्य आहे पण गरिबांवं कायीबी आन्याव कराव हे कान्या देवानं ग्यानं देलं....'' निसर्गानं

माणसाला एकाच सूत्रात बांधले पण माणूस माणसामध्ये भेदभावाच्या भिंती का म्हणून उभा करतो ? या प्रश्नाने बाज्या बेफाम होतो. वाडयातील संस्कृती, माणसं एक देखावा असतो. कृतीशून्य वागतात. माणसाला लाचार, बनविण्यातच त्यांना खरी जिंदगी जगण्यात आनंद वाटतो. हे कुठेतरी संपायला पाहिजे असेच मनोमनी लेखकाला वाटते.

गुण्या येस्कर, राघोबा आदी लाचारीचे बळी ठरलेले. माणूस माणसाला लाचार बनवितात, त्याला पाण्यात पाहतात. लाचार माणसाला नसते दिशा. ते वागतात कळसुत्र्या बाहुल्यासारखे जसं नाचवलं तसं नाचतात. राघोबासमक्ष राधीची अब्रु पाटील लुटतो. तो राघोबा पाटलाविरूध्द संघर्ष करत नाही. सगळं मूकपणे सहन करतो. पाटील अशा पध्दतीने कर्ज वसूल करतो. तरीही आंधवाडीला जाग येत नाही. त्यांची मने पेटून उठत नाहीत वाडयाने कितीतरी पोरींचे आवाज बंदिस्त केले. या कादंबरीतील काही विचार अतिशय मनाचा ठाव घेतात. ''माणूस इतका बेमान त्यांन माणसालाच गुलाम बनविलंल. निसर्गानं कुणाला लहान मोंठं समलयं नाय. पण मानसानं मानसा मानसात भेदभावाच्या रेघा वाढल्या. येकाचं पाढरीवं राहणार पाटीलबी मानूस अन् आंधबी मानूस, पाटलाला मान लय. आंधाला बिलकूल नाय. पाटील कितीही नालायक असला तरी तो मोठाच.... रानात समद्यं जनावरं पाखरं कसे माय लेकराच्या इचारानं जगत्येत. कोनी कोनावं इनाकारन मानसालाच तरास देते ? आपून आंध समाजात जलमाला आलो तं लय गुन्हा झाला काय? मला समजत नायी, कोनाच्या डोस्क्यातून या जाती आल्या ? कोनं पाटलालेजाच करायचीमुभा देली. माय नाय पटत हे थोतांड....'' ही माणुसकीची भाषा व तळमळ बाज्या क्षणोक्षणी प्रकट करत असतो. बाज्या आणि शेषा पाटलाच्या जाचाने रानावनात जगणे पत्करतात पण त्याच्या पायाची वाहान म्हणून जगत नाही. पाटलाचा मुदडा पाडणे हाच एकमेव आंधांना खरे स्वाभिमानाने जगता येईल असा उपाय आहे असे बाज्याला वाटते.

आंध समाजाच्या जगण्याचे विविध स्तर, त्यांची मानसिक आंदोलने, आंतर संघर्षाचे ऐतिहासिक संदर्भासहित चित्रण लेखकाने केले आहे. येथे अनुभवाचा विविधांगीपणा, सर्वपर्शता, गुंतागुतीची उकल याचा अचूकपणा प्रकट करणारी मानसिकता समर्थपणे लेखकाने अधोरेखित केल आहे. वास्तव व प्रत्यक्षात जीवनाचा एक चित्रपट 'वाडा' ने उभा केला आहे. समावेशकता हेच कादंबरीचे मूलभूत वैशिष्टये आहे. येथील दु:ख प्रातिनिधिक व वैश्विक स्वरूपाचे असून माणूस येथे केंद्रबिंदू आहे. स्वत:च्या अस्तित्वाची जाण नसलेला डोंगर–दऱ्यात, कपारीत, अंध:कारात वणवण भटकंती जीवन कंठणारा, आदिवासी जीवनाच्या मुख्य प्रवाहात कसा सामील होईल याचे मार्मिक चित्रण लेखकाने केले आहे.

प्रा.माधव सरकुंडे यांनी वाडयाला चौदा प्रकरणात विभागले आहे. अस्सल ग्रामीण जीवन व भाषा यांच्या जीवंतपणामुळे कादंबरीत मूल्यांना धक्का न बसता जे व जसे आहे तसेच सरळसोट मांडल्यमुळे बाणेदारपणा कायम राहिला. ही कादंबरी अश्लील आहे असा बिनबुडाचा आरोप प्रस्थापितांनी केला त्याला काहीच तथ्य नाही. प्रस्थापितांकडून न्याय मिळण्याची मुळीच अपेक्षा नाही. लेखक समीक्षेच्या दृष्टीने कांदबरीचा विचार करत नाही. कारण मानवी जीवनासंबंधी निगडित उपायायच खऱ्याा अर्थाने मानव जातीला हितकारक ठरत असतात याची जाणीव लेखकाने करून दिली आहे.

आंध जमात एकूणच दुर्बल असून अंधश्रध्देच्या खुळचट कल्पनेत आंकठ बुडून गेली आहे. त्याला बाहेर काढणे काळाजी गरज आहे. लेखकाचे मनोगत या संदर्भात खूपक बोलके आहे. विचार प्रवृत्त करणारे आहे. ते म्हणतात, ''कुणी एकविसाव्या शतकाकडे जाण्याची गोष्ट केली की, मला ती थट्टा वाटते. भाकीरच्या प्रश्नाने ज्यांचा मेंदूच खाऊन टाकला त्याच्या पायात एकविसाव्या शतकाकडे जाण्याची गोष्ट केली की, मला ती थट्टा वाटते. भाकरीच्या प्रश्नाने ज्यांचा मेंदूच खाऊन टाकला त्याच्या पायात एकविसाव्या शतकाकडे जाण्यासाठी कुठून त्राण येणार ? त्याला कशी कळणार लोकशाही, राष्ट्रीय एकात्मता ? जो आपल्या आयुष्यभरात जिल्हयाच्या ठिकाणी येऊ शकत नाही तो राष्ट्रीय मंजधारेत कसा येईल ? स्मशानात जाऊन तिसऱ्या दिवशी मागणीचं प्रेत उकरणारा खंडया (बैंगण्या), वाघाच्या छातीवर बसणारा घावस, बैलासारखे ग्यानबा पाटलाचं छेकडं ओढणारे बळया, गुण्या, येस्कर, नाऱ्या, माध्या, वडदवरून पळून येणारी सरी, दुष्काळात भुकंपापायी स्वत:ची मुलगी तमासगिराला एक पायली वाटाण्यात विकणारी रावणाबाई यांच्या जीवनाशी करूण कहाणी लेखकाने अतिशय उत्कटपणे मांडली आहे.

''आदिवासी साहित्य ही प्राचीन संस्कृतीचे लेणे आहे. ती जशी सांस्कृतिक आहे तशीच ती एक सामाजिक, साहित्यिक अंगातून वाटचाल करते. आदिवासी साहित्याचा आधार सांस्कृतिक जाणिवेतच शोधला पाहिजे. आदिवासी साहित्याचा प्रेरणा त्यांच्या सांस्कृतिक अधिष्ठानातच आहेत.'' या प्रा.डॉ.विनायक तुमराम यांच्यापुढे जाऊन माधव सरकुंडे फुले–आंबेडकरी विचारसणीतून वाडयाकडे बघतात. आंध जमातीच्या जीवनाचे स्वकथन करणारी 'वाडा' ही ऐतिहासिक व क्रांतीकारी स्वरूपाची कादंबरी म्हणून केलेली वाटचाल प्रशंसनीय अशी आहे.

भारतातील अनेक प्रांतात आणि महाराष्ट्रातील बहुतेक जिल्हयात आंध जमातीचे लोक आढळून येतात. नांदेड, परभणी, बुलडाणा, वाशीम, अकोला, यवतमाळ येथे आंध जमात आहे. यवतमाळ जिल्हयात दिग्रस तालुक्यामध्ये आंधाची एकूण लोकसंख्या चाळीस हजार एवढी आहे. आंधाच्या वस्तीला वेटाळ म्हणतात. महाराष्ट्रातील आंध जमात मराठी समाजजीवनाशी एवढी समरस झालेली आहे की, त्यांना वेगवेगळे असे कुणी समजू शकत नाही. प्रा.सरकुंडे यांनी कादंबरीतून आंध जमातीच्या विविध अंगाचे चित्रण वैशिष्टयपूर्ण पध्दतीने केले आहे. मराठी कादंबरीचे दालन समृध्द करण्याचे हे सांकेतिक सूचक चिन्ह आहे.

आदिवासी या देशातील मूळ निवासी असून तो जाही उपराच जगतो आहे. आदिवासी संस्कृती अनेक रीती–रिवाजावरून आज्चया आधुनिक समाजव्यवस्थेत सुध्दा एक समाज घटक दुसऱ्या समाजघटकापासून वेगळा ओळखू शकतो. भाषा, पोशाख, लग्नविधी, पूजा–अर्चा, लोकनृत्य इत्यादींचे वैशिष्टय हे संस्कृतीचे मुख्य घटक असतात. आज त्या–त्या समाज घटकातील तरूणांनी समाजाचे ऐतिहासिक संशोधन करून पुढील पिढीला मार्गदर्शन करावे ही अपेक्षा कादंबरीतून व्यक्त केलेली दिसते.

दलित व आदिवासी साहित्याीच जातकुळी मिळतीजुळती आहे. दु:खाची तीव्रता सारख्या प्रमाणात व्यक्त होणारी आहे. तसेच लेखकाने ही कादंबरी डॉ.बाबासाहेब आंबेडकर व आंध जमातीच्या सहनशीलतेला अर्पण केली आहे. ही बाब विचारार्ह अशी आहे. सामाजिक बांधिलकी व जाणीव वृध्दींगत करणारी परिवर्तनशील वाटचाल आहे. साहित्यातील सामाजिकतेचा विचार मूलगामी पातळीवर होणे 'वाडया' ची खरी फलश्रृती आहे.

प्रा.माधव सरकुंडे यांनी 'वाडा– मध्ये जीवंत व वास्तव अनुभव चितारला आहे. त्यापाठीमागे निश्चित एक सामाजिक भान, परिवर्तनवादी चळवळीचे अंत:सूत्र आहे. फुले–आंबेडकरी चळवळीतील सामाजिक बांधिलकी येथे आहे. ते चित्र स्पष्ट होत नसले तरीही समग्र जीवनाकडे त्यांचा बघण्याचा दृष्टीकोन विचारात घेण्यासारख आहे. कारण त्यांनी जे भान जपलेले जाणवते ते फले–आंबेडकरी विचारप्रेरणा स्विकारणाऱ्या लेखकाच्या बांधिलकीशी नातेसंबंधाच्या सीमारेषा कदाचित धुसर आणि अस्पष्ट जाणवत असतीलही परंतु जाणीवांच्या पातळीवर अनुभवसिध्दता सारखीच असल्याचे स्पष्ट होते. पुढे मागे या सीमारेषा आधी उलगडण्याचा संभवही नाकारता येत नाही. उजेडाची जीवन जाणीव चित्रित करणारी प्रा.माधव सरकुंडे यांची 'वाडा' ही कादंबरी समग्र आदिवासी अस्मितेचा हुंकार ठरेल हा दुर्दम्य आशावाद व्यक्त करायला हरकत नाही. दत्ता सरकुंडे यांचे मुखपृष्ठ विषयाला अनुरूप असून यातील आतील रेखाटणे अतिशय सुंदर,रेखीव व भावसूचक दृष्टीतून आकारास आली आहेत.